आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २१ वा ● शनिवार दि. ०८ जून २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### कपिल पाटील यांच्या पराभवामुळे आलेल्या नैराश्यातून तरूणाची आत्महत्या, शहापूरमधील घटना

कल्याण : भिवंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचा पराभव झाल्यामुळे अस्वस्थ असलेल्या शहापूर तालुक्यातील साजिवली गावातील खैरेपाडा येथील संजय पद्माकर अधिकारी (३५) या भाजपच्या कार्यकर्त्याने बुधवारी रात्री राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. शहापूर तालुक्यातील भाजपचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून संजय अधिकारी यांची ओळख होती. सरळांबे ग्रामपंचायत आणि परिसरातील सामाजिक कार्यात संजय आघाडीवर असायचे. कपील पाटील यांच्या विजयासाठी त्यांनी शहापूर तालुक्यात प्रचाराचे काम केले होते. एका पायाने अपंग असुनही त्यांची पक्ष कार्यासाठीची धडपड कौतुकास्पद होती.

भिवंडी लोकसभेत कपिल पाटील पुन्हा खासदार म्हणून निवडून जावेत यासाठी संजय अधिकारी यांची धडपड होती. भाजप कार्यकर्त्यांना घेऊन **(पान ४ वर)**...

### ''मोदी सांगतील ते मान्य करून पुढे जाऊ''; नितीश कुमारांचाही चर्चांना पूर्णविराम!

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर पूर्ण बहुमत न मिळाल्याने एनडीएतील घटकपक्षांची भूमिका महत्त्वाची झाली होती. अशावेळी एनडीएचा घटकपक्ष असलेल्या जेडीयूचे नेते नितीश कुमार काय निर्णय घेतात? याकडे सर्वांचंच लक्ष्य लागलं होते. एवढंच नाही, नितीश कुमार एनडीएची साथ सोडत परत इंडिया आघाडीबरोबर जातील, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगू लागली होती. मात्र, या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. पुढची पाच वर्ष आम्ही पंतप्रधान मोदींना साथ देऊ, असं आश्वासन नितीश कुमार यांनी दिली आहे. आज झालेल्या एनडीएच्या बैठकीत त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. ''आम्ही नरेंद्र मोदींना समर्थन देण्याचा निर्णय घेतला आहे. ते गेल्या १० वर्षापासून पंतप्रधान आहेत. तसेच तिसऱ्यांदा पंतप्रधान होत आहेत. याचा मला आणि आमच्या पक्षाला आनंद आहे. मोदींनी गेल्या १० वर्षात देशातील जनतेची सेवा केली आहे. पुढे पाच वर्षही ते देशातील जनतेची सेवा करतील, असा आम्हाला विश्वास आहे. त्यामुळे आम्ही पुढची पाच वर्षे मोदींबरोबर राहून त्यांना साथ देऊ आणि मोदी सांगतील ते मान्य करून पुढे जाऊ'', अशी प्रतिक्रिया नितीश कुमार यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी विरोधकांनाही लक्ष्य केलं आहे. ''विरोधी पक्षातील काही लोक यंदा जिंकून आले आहेत. पण पुढच्या वेळी विरोधी पक्षातले सगळे हारतील याचा मला विश्वास आहे. त्यांनी आजपर्यंत जनतेची कोणतीही कामे केली नाहीत. त्यापेक्षा जास्त कामे पंतप्रधान मोदी यांनी केली'', असे ते म्हणाले.

### बारामतीचा पराभव अजित पवारांच्या जिव्हारी? ११ मिनिटांच्या पत्रकार परिषदेत अजित पवारांचे सहावेळा 'हे' वक्तव्य

मुंबई : सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघ हा हाय वोल्टेज मतदारसंघ ठरला. या मतदारसंघात एकाच घरातील दोघेजण एकमेकांविरोधात उभे ठाकले होते. शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे आणि अजित पवार गटाच्या सुनेत्रा पवार यांच्यात जंगी फाईट झाली. या लढतीत सुप्रिया सुळे यांनी चांगल्या मताधिक्याने सुनेत्रा पवारांचा पराभव केला. हा पराभव अजित पवारांनी निकालाच्याच दिवशी मान्य केला. त्यानंतर आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा पराभवाची जबाबदारी स्वीकारली. या संपूर्ण ११ मिनिटांच्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी ''बारामतीत मीच कमी पडलो'' हे वाक्य सहावेळा उच्चारले. त्यामुळे हा पराभव अजित पवारांच्या जिव्हारी लागला असल्याचे स्पष्ट होतेय.

बारामतीत पराभव होण्यामागची कारणे काय? असा प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला. त्यावेळी अजित पवार म्हणाले, ''आम्ही कमी पडलो म्हणून आम्ही हरलो.'' तसंच, या मतदारसंघात भाजपाची साथ योग्यरित्या मिळाली नसल्याचीही टीका केली जातेय. त्यावर ते म्हणाले की, ''ज्याने त्याने आपआपल्या परीने योग्य काम केले. पण मीच कमी पडलो.'' अजित पवारांनी हा पराभव अगदीच मनापासून स्वीकारला असल्याचे दिसतेय. कारण या संपूर्ण पत्रकार परिषेदत दर पाच वाक्यानंतर मीच कमी पडलो हे वाक्य त्यांनी सतत उच्चारले. ते म्हणाले की, ''बारामतीत मी कमी पडलो हे निर्विवाद सत्य आहे. ते कोणत्या कारणाने पडलो, काय पडलो हे त्यांच्याशी चर्चा केल्यावर मला ते कळेल. कारण सुप्रिया निवडून आली तरी ग्रामीण भागात हवा तसा उत्साह पाहायला मिळाला नाही. चौकात गुलाल वगैरे उधलले गेले. पण आम्ही कमी पडलो'', असे अजित पवार म्हणाले. ''जनतेने दिलेला कौल आम्ही स्वीकारला आहे. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू. उद्या सकाळी आम्ही दिल्लीला जाणार आहोत. एनडीएचे सर्व प्रमुख पक्ष, घटकपक्ष असणारे खासदारांना बोलावले आहे. तिथे गेल्यानंतर काही वेळ मिळतो. त्यावेळी देवेंद्र, एकनाथ आणि मी सगळे सहकारी चर्चा करू. म झे स्वत:चे मत आहे. अपयश कशामुळे मिळालेय हे कळलेय. त्यामुळे ज्यात कमी पडलो आहे हे लक्षात घेऊन विधानसभेत त्या चुका दुरुस्त केल्या जातील'', असे अजित पवार म्हणाले.






मुंबई येथील टिळक भवन येथे आज डॉ.शिवाजी काळगे यांच्यासह राज्यातील पक्षाच्या सर्वच नवनिर्वाचित खासदारांचा, प्रदेशप्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री आमदार अमित देशमुख व इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिला आहे, त्यामुळे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करून त्यांचा विश्र्वास कायम सर्व नवनिर्वाचित खासदार आणि राज्यातील काँग्रेस पक्षाचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांनी सक्रिय राहण्याचा आणि आगामी निवडणुकीतही सर्वांनी एकजूट दाखवून चांगले यश संपादन करण्याचा निर्धार यावेळी झालेल्या बैठकीत करण्यात आला आहे.

## चंद्राबाबू नायडूंचा नरेंद्र मोदींवर स्तुतीसुमनांचा वर्षाव, 'इंडिया आघाडी'च्या आकांक्षांवर पाणी?



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला बहुमत मिळाल्यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ९ जून रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्याआधी एनडीएच्या संसदीय दलाची संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये बैठक पार पडली. या बैठकीत सर्व एनडीएच्या नेत्यांनी नरेंद्र मोदी यांची संसदीय दलाचे नेते म्हणून निवड केली आहे. यावेळी अमित शाह, नितीन गडकरी, नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू यांनी नरेंद्र मोदी यांच्या आदी नेत्यांनी संसदीय दलाचे नेते म्हणून पाठिंबा दिला.

यावेळी चंद्रबाबू नायडू यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला. इंडिया आघाडीने चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांच्या पाठिंब्यासाठी संपर्क साधल्याची चर्चा आहेत. पण चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांनी एनडीएबरोबरच राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर आज एनडीएच्या संसदीय दलाची संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये बैठक पार पडली. या बैठकीत नरेंद्र मोदी यांची संसदीय दलाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. यावेळी चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांनीही पाठिंबा दिला. त्याम ुळे आता इंडिया आघाडीच्या सत्ता स्थापेनेच्या आणि चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार हे इंडिया आघाडीकडे येतील, या आकांक्षांवर पाणी फेरलं आहे.

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आंध्र प्रदेश विधानसभेची निवडणूक जिंकण्यास मदत झाली. नरेंद्र मोदी, जे पी नड्डा, अमित शाह, नितीन गडकरी यांच्या सभांमुळे मतदारांमध्ये म ोठा निश्वास निर्माण झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांचा भारताचे पंतप्रधान होत आहेत. हे देशासाठी अभिमानाची बाब आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश अव्वल स्थानी जाईल. एन टी आर यांचं व्हिजन नरेंद्र मोदी प्रत्यक्षात उतरवत आहेत. नरेंद्र मोदी यांच्यासारखा उत्तम नेता भारताकडे आहे. त्यांच्याकडे देशासाठी व्हिजन आहे'', असं चंद्रबाबू नायडू यांनी म्हटलं आहे.

## लातूर पोलिसांची गुटख्याच्या कारखान्यावर धाड ४४ लाखापेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त



लातूर : लातूर पोलिसांकडून पुन्हा एकदा एमआयडीसी परिसरात गुटखा बनविणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून ४४ लाखापेक्षा जास्त मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मागील आठवड्यात अतिरिक्त एमआयडीसी परिसरात लातूर पोलिसांकडून गुटखा बनविणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून ३ कोटी रुपया पेक्षा जास्त किमतीचा गुटखा व गुटखा बनविण्याचे साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. एमआयडीसी पोलिसांना गोपनीय मिळालेल्या माहितीच्या आधारे लातूर अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील राहुल कोल्ड्रिंक्स, प्लॉट नंबर १४८ या गोडाऊन वर दिनांक ०७ जून २०२४ रोजी छापा टाकला असता शासन प्रतिबंधित गुटखा व गुटखा तयार करण्याचे साहित्य असे ४४,२२,६७८/- (४४लाख २२ हजार ७६८ रुपये) रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

सदर प्रकरणी यातील आरोपी नामे १) विजय केंद्रे, २) जयपाल जाधव, ३) बाळासाहेब वाघमारे, ४) मल्हारी मजगे आणि ५) अर्जुन केदार यांचे विरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशन लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. सदर प्रकरणी श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, श्री भागवत फुंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री एस डी नरवाडे, पोलीस उपनिरीक्षक श्री कराड, सहाय्यक फौजदार श्री जगताप, पोलीस हवालदार पिस्तुलकर, पोलीस हवालदार देशमुख, पोलीस नाईक भोसले, गाडे पोलीस अंमलदार दळवे व चालक पोलीस अंमलदार जाधव यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

## शहर स्वच्छतेसाठी रात्री उशिरापर्यंत राबले मनपा अधिकारी व कर्मचारी !





लातूर/ प्रतिनिधी : सायंकाळी शहरात झालेल्या जोरदार पावसानंतर विविध भागात तुंबलेल्या पाण्याला रस्ता करून देत शहर स्वच्छतेसाठी मनपाचे अधिकारी व कर्मचारी रात्री उशिरापर्यंत राबले. शहरात ज्या ठिकाणी पाणी साठले होते तो संपूर्ण परिसर स्वच्छ केल्यानंतरच हे अधिकारी व कर्मचारी आपापल्या घरी पोहोचले.

गुरुवारी सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला.यामुळे शहरातील कांही सखल भागात पावसाचे पाणी साठले. अचानक झालेल्या मोठ्या पावसामुळे पाण्याचा लवकर निचरा झाला नाही.शहरातील सरस्वती कॉलनी,सौभाग्य नगर, बरकत नगर,चाणक्य सोसायटी,उस्मानपुरा,नाना- नानी पार्क,नवविकसित एसटी हाऊसिंग सोसायटी, केशवनगर, इस्लामपुरा,डी मार्ट,मंत्री नगर,देशमुख नगर, रेणापूर नाका,कन्हेरी,जुने जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम भवन या भागातील नाले तुंबले होते. त्यामुळे सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते.

ही बाब लक्षात आल्यानंतर मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी या परिसरातची तात्काळ स्वच्छता करून साठलेल्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मनपा अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार, सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे,स्वच्छता विभाग प्रमुख, रमाकांत पिडगे,अग्निशमन अधिकारी सुभाष कदम, क्षेत्रीय अधिकारी,स्वच्छता निरीक्षक यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कामकाजाला गती दिली.कर्मचाऱ्यांनी या परिसरातील नाल्यांमध्ये अडकलेला कचरा काढून पाण्याला वाट मोकळी करून दिली. अनेक ठिकाणी वाऱ्यामुळे झाडे पडली होती. ती देखील तात्काळ उचलण्यात आली. नाल्यांमधून काढलेला कचरा लगेचच उचलून घेण्यात आला. यामुळे साठलेल्या पाण्याचा लगोलग निचरा झाला.

पावसाळ्याच्या काळात शहरात कुठेही पाणी साठू नये आणि नागरिकांना त्रास होऊ नये याची खबरदारी मनपाकडून घेतली जात आहे.मनपाने शहरातील लहानमोठ्या नाल्यांची स्वच्छताही केली आहे.गुरुवारी झालेल्या पावसानंतरही मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत काम केले.यामुळे त्या परिसरातील नागरिकांनी मनपाचे आभार मानले.

### समृद्धी महामार्गावर पुन्हा भीषण अपघात, सीआरपीएफच्या दोन जवानांचा मृत्यू

यवतमाळ : बीड येथील निवडणूक बंदोबस्त आटपून गडचिरोलीकडे जाणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलातील (सीआरपीएफ) जवानांच्या वाहनाला भरधाव ट्रकने पाठीमागून धडक दिली. ही धक्कादायक घटना धामणगावजवळील समृद्धी म हामार्गावर गुरूवारी दुपारी घडली. या अपघातात एक जवान जागीच तर दुसऱ्या जवानाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गिरीष कुमार (४२, रा. केरळ) आणि मिठा तेजश्वरराव (३६, रा. आंध्रप्रदेश) अशी मृत जवानांची नावे आहेत. तर अब्दुल रफ असे जखमी जवानाचे नाव आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, लोकसभा निवडणूक मतमोजणी बंदोबस्तासाठी सीआरपीएफचे जवान बीड येथे आले होते. बंदोबस्त आटोपल्यानंतर जवानांचे वाहन बीड येथून गडचिरोलीकडे निघाले होते. अश्यात गुरूवारी दुपारी धामणगावजवळील समृध्दी महामार्गावर भरधाव ट्रकने सीआरपीएफ जवानांच्या वाहनाला मागच्या बाजूने धडक दिली. या धडकेत मिठा तेजश्वरराव या जवानाचा जागीच मृत्यू झाला, तर गिरीष कुमार आणि अब्दुल रफ गंभीर जखमी झाले होते. दरम्यान रूग्णवाहिकेच्या मदतीने जखमी जणांना यवतमाळ येथील शासकीय रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. सायंकाळी गंभीर जखमीमधील गिरीष कुमार या जवानाचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर अब्दुल रफ यांच्यावर उपचार सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी रूग्णालयात भेट देवून जखमी जवानांची चौकशी केली. शवविच्छेदनानंतर मृत जवानांचे शव नागपूर विमानतळावरून त्यांच्या मूळ गावी पाठविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी दिली. या अपघातातील जखमींना यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आल्यानंतर प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत जवानांना तत्काळ उपचार करण्यासाठी तत्परता दाखवली. स्वत: जिल्हाधिकारी रुग्णालयात पोहचले. त्यांनी जखमी जवानांची आस्थेने चौकशी केली. या जवानांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या. मृत जवानांचे मृतदेह त्यांच्या मुळ गावी पाठविण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पवन बनसोड यांनी यंत्रणेस कामी लावले. गडचिरोली सीआरपीएफशी समन्वय साधून परिस्थिती हाताळली.

दरम्यान, समृध्दी महामार्गावर दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढल्याने या महामार्गावर जागोजागी अपघात नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी होत आहे.

### ''ते आज तुमचे उद्या आमचे होतील'', नितीश कुमार यांचा उल्लेख करत राऊतांचे सूचक विधान!

मुंबई : लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता भाजपकडून नव्याने सरकार स्थापनेची तयारी केली जात आहे. काही दिवसांपूर्वीच एनडीएचा घटकपक्ष असलेल्या संयुक्त जनता दलाने (जदयू) आणि तेलुगू देसम पार्टी (टीडीपी) पक्षाने भाजपला आपला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे आता लवकर नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. दरम्यान, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर विरोधकांची इंडिया आघाडी सत्तास्थापनेची चाचपणी करत आहे, असे सांगितले जात होते. प्रत्यक्षात मात्र इंडिया आघाडीने विरोधी बाकावर बसण्याची भूमिका घेतली आहे. असे असतानाच आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी सूचक विधान केलंय. त्यांच्या या विधानेच अनेक अर्थ काढले जात आहेत. सरकार चालवताना भाजपच्या नाकी नऊ येणार आहेत. मुळात एनडीए आहेच कुठे. चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांनाच महत्त्व आहे. नितीशबाबू तर सर्वांचेच आहेत. चंद्राबाबू नायडू हेदेखील सर्वांचेच आहेत. ते आज तुमचे उद्या आमचे होतील. नितीश कुमार यांच्या जेडीयू पक्षाचे केसी त्यागी यांनी अग्नीवीर या योजनेला विरोध केला आहे. मोदी यांनी प्रचारादरम्यान जी आश्वासने दिली, त्याला त्यागी यांनी विरोध केला. मोदी तर प्रचारात सांगायचे की काँग्रेस आणि इतर विरोधक सत्तेत आल्यास ते मुस्लिमांना आरक्षण देतील, असे सांगायचे. पण आता एनडीएतील चंद्राबाबू नायडू हे मुस्लीम आरक्षणाच्या समर्थन करतात. त्यामुळे आता भाजप काय करणार?

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – भारतीयाना नको असेलेले नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान बनले आहेत पण विरोधी पक्ष म्हणून कॉंग्रेस, इंडिया नेतृत्व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अमानुष घोडदौड रोखतील काय याची चिंता वाटतेय, कांहीच कळत नाही, डोकं बधीर झालाय.

दुसरा – अरे, जनतेने कॉंग्रेस, इंडिया आघाडीकडे नेतृत्व दिले नाही परंतू विरोधी बाकावर बसून मोदी पाडाव करा हा जनादेश दिला आहे. त्यामूळे नक्कीच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रणालीस अडकाटी येईल यात संदेह नाही तू काळजी करु नकोस.

एक – अहो, असे कसे बोलता, प्रधानमंत्री नरेंद्र हे वट हूकूमी कारभार करणारे, जनतेवर मनमानी लादणारे पंतप्रधान आहेत. ते विरोधकाना जूमानणारे नाहीत म्हणून भिती वाटतेय.

दुसरा – अरे, काळजी करु नकोस. मागील दोन टर्म या भाजपाकडे स्वतःचे बहूमत होते परंतू आघाडीच्या जोरावर मनमानी करीत होते पण आजघडीला मोदी महायूतीत चंद्राबाबू नायडू व नितिशकुमार हे स्वतंत्र विचाराचे नेते असल्याने मोदीजीचा लगाम नायडू, नितिशकुमाराच्या हाती आहे. त्यामूळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मागीलप्रमाणे मनमानी वळवळ करुच शकत नाहीत हे लक्ष्यात ठेव.

एक – अहो, पण मोदीजीकडे शहा, राजनाथसिंह हे कपटी राजकारणी असल्याने भिती वाटतेय. म्हणून बोलतो आहे. तूम्ही नाहक धीर देवू नका.

दुसरा – अरे, चंद्राबाबू नायडू, नितिशकुमार हे पूर्वी ही भाजपा बरोबर होते पण त्यांचे जमेनासे झाले होते ते बाजूला गेले आणि भाजपा विरोधी आघाडीत आले. परंतू सत्तापदाच्या खेळीत आज ते मोदीजी बरोबर असले तरी उद्याला ते नंदीबैल म्हणून राहूच शकत नाहीत उलट नायडू–नितिशकुमारच मोदीजीना रेषा आहे हेच समजून चल. बदलासाठी देर असेल पण अंधेरा नसतोच. मोदीजीना पंतप्रधानपद सोडून विश्वगुरु बनण्यापलिकडे दुसरा पर्यायच नाही हे निश्चितपणे लोकभावना प्रकट होताना दिसते आहे.

## काय बोलता राव ?

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यानी पहिले तीन टर्म अर्थात तिनवेळा पंतप्रधान म्हणून सलग पंधरा वर्ष भारताचा कारभार पाहीला होता. त्याच धर्तीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान बनल्याने ते नेहरु यांची बरोबरी करतानाच्या वावड्या उठताना दिसत असले तरी ती बरोबरी अध्र्यावर खूंटते की काय असेच चित्र दिसते आहे. कारण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा शापथविधी रविवारी असतानाच तत्पूर्वी रालोआतील चंद्राबाबू नायडू आणि नितिशकुमार यानी पद, मंत्रीपदावरुन दबावतंत्री सुरु केल्याचे दिसते आहे.

**काय बोलता राव,**

नितिशकुमार, चंद्राबाबू हे हेकाडी, मुत्सद्दी राजकारणी आहेत. शरद पवारा प्रमाणे, फाटे, पालव्या, शेंड्याना धरुन बूडाला हात घालणारे नायडू–नितिशकुमार नाहीत तर ते चक्क बूडालाच पोखरणारे नेते आहेत. म्हणूणनच की काय दोघानाही लोकसभा अध्यक्षपद दिलेच पाहीजे असा जोर धरला असून चंद्राबाबूनी लोकसभा अध्यक्ष, माहीती तंत्रज्ञ, पंचायत राज, रेल्वे मंत्रालयाची मागणी केली. तर नितिशकुमार यानीही तीच मंत्रालये मागीतली असून ग्रामविकास मंत्रापदाची भर पडली, अग्नीवीर, लष्करी योजना रद्द करावी अशी अट घातली असल्याने शपथविधीपूर्वीच चंद्राबाबू–नितिशकुमार यांचा खोडा कोणत्या वळणावर जातो हेच कळत नाही. मग बोला दाजीबा.



**माजलगाव:– श्रीहरी(नाना)मोरे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना छगन कांबळे(सरपंच)सिमरी पारगाव,श्रीरामजी फरकांडे सेवा सोसायटी सदस्य,मुरलीधर साळवे सर पंचायत समिती सदस्य व इतर**

## अंतराळवीर सुनिता विल्यम्सची मोठी काम गिरी; तिसरी अवकाश झेप यशस्वी!

मुंबई : भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स १ जून रोजी तिसऱ्यांदा अंतराळ प्रवासाला जाणार होती. मात्र हा प्रवास अंतिम टप्प्यात येऊन यंत्रणा बिघाडामुळे पुढे ढकलण्यात आला होता. त्यामुळे सुनीता विल्यम्सची तिसरी झेप लांबणीवर गेली होती. त्यानंतर आता सुनिता विल्यमस यांची तिसरी अवकाश भरारी यशस्वी झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणाऱ्या या पहिल्या सदस्य बनून त्यांनी नवा इतिहास रचला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी काल संध्याकाळी केप कॅनाव्हेरल येथील प्रक्षेपण तळावरून बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातून झेप घेतली. विल्यम्स आणि तिचे सहकारी बुच विल्मोर यांचे हे उड्डाण काही तांत्रिक समस्यांमुळे पूर्वी दोन वेळा रद्द करण्यात आले होते. मात्र, काल यानाने यशस्वीरित्या झेप घेतली आहे.बोईंग क्रू फ्लाइट टेस्ट (सीएफटी) नावाचे हे मिशन नासाच्या कमर्शियल क्रू प्रोग्रामच्या रुपात सुरू करण्यात आले होते. इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर नियमित क्रू फ्लाइटसाठी स्टारलाइनर प्रमाणित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असणार आहे.

# डॉ. काळगे देशमुखामुळे नव्हे, भाजपा विरोधी दलित, मुस्लिमामूळे विजयी !

## संपादकीय...

कॉंग्रेस पक्ष आणी दलिताना भाजपा नको हाता तर लातूर लोकसभा राखीव अनुसूचित जाती मतदार संघात लातूरचे स्थानीक कॉंग्रेस नेते माजी मंत्री आ. अमित देशमूख यांना अनुसूचित जातीतील बौध्द, मातंग समाजाचा उमेदवार नको होता म्हणूनच अनुसूचित जातीतीलाच स्वतःला सवर्ण, हिंदू समजून घेणारे माला जंगम अर्थात लिंगायत समाजाचे गुरु म्हणविणारे डॉ. शिवाजी काळगे याना कॉंग्रेसच्या नावाखाली भाजपाचे कार्यकर्ते डॉ. शिवाजी काळगे याना लातूर लोकसभा मतदार संघातून राखीव कोट्यातून उमेदवारी देवून निवडून आणले परंतू डॉ. काळगे यांचा विजय हा कॉंग्रेस पक्ष किंवा आ. अमित देशमूख यांच्यामूळे नसून केवळ भाजपा विरोधी दिलत, मुस्लिम मतदाराच्या मतामूळेच झाला असल्याची प्रतिक्रिया सर्वत्र उमटताना दिसते आहे.

लातूर लोकसभा राखीव मतदार संघातून भाजपाचे बौध्द समाजाचे असलेले उमेदवार खा.सुधाकर शृंगारे याचा पराभव झाला तो कॉंग्रेस व काळगे मुळे नसून बौध्द, दलिताच्या विरोधी मतदानामूळे अर्थात भाजपामूळेच झाला असून केवळ दगडापेक्षा विट मऊ म्हणूनच बौध्द, मातंग, दलित, मुस्लिमानी डॉ. काळगे यांना मतदान केले कारण खा. सुधाकर शृंगारे हे निष्क्रियच होते. पण बौध्द होते म्हणून त्याना जनतेने स्विकारले होते. पण राष्ट्रीय स्वंय सेवक, भाजपाच्या दबावामूळे ते दलित वस्तीत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यापासून दूर राहीले तो ही राग होताच पण भाजपा नको हीच भुमिका घेवून कॉंग्रेस तर्फे निवडणूक रिंगणात उतरलेले डॉ. शिवाजी काळगे यांना विजयाचा मार्ग सुकर झाला हे विसरता कामा नये असाच बोलबाला राजकीय वर्तूळात होताना दिसतो आहे. हा सारा धांडोळा समोर असनाही लातूरचे स्थानीक कॉंग्रेस नेते माजी मंत्री आ. अमित देशमूख हे मात्र मीच आम्हीच डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयाचे शिल्लेदार आहोत अशी जी परिस्थिती बनवून जनतेला, कॉंग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते सर्वार्थी चूक असून बेगाने शादी मे अब्दूल्ला दिवाना, अशीच स्थिती आ. अमित देशमूख यांची बनल्याची प्रतिक्रिया लातूरच्या कॉंग्रेसी वर्तूळात होताना दिसते आहे. हे वास्तव नाकारता येत नाही अशी कबूली एका निष्ठावंत कॉंग्रेसनेत्यानी आमच्याकडे बोलून दाखविली हे वास्तव कोण, कसे नाकारणार हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो असे म्हटल्यास वावगे ठरु नये कारण लातूरच्या पुरोगामी, प्रतिगामी अर्थात भाजपा, कॉंग्रेसच्या राजकारणात दमच राहीला नाही. कारण राष्ट्रीय, राज्यस्तरीय पातळीवर कॉंग्रेस, भाजपाचे ईळा–भोपळ्या सारखे राजकीय मतभेद असताना लातूरात मात्र कॉंग्रेस, भाजपा हे अर्धे आमचे, अर्धे तूमचे म्हणून स्थानीक स्वराज्य संस्था आणी विधानसभा निवडणूकीत बेरीज, वजाबाकी करीत राजकारण, सत्ताकारण निभवित असल्याने उद्याच्या काळात दलित, मुस्लिम जनता निर्णायक धोरणातील पोंहचू शकते हा धोका नाकारता येण्यासारखा नसावा अशीच प्रतिक्रिया प्रसारमाध्यमातून प्रकट होताना दिसते आहे. वास्तविक पाहाता आजवर महाराष्ट्र कॉंग्रेस म्हणजे विलासराव देशमूख अशीच ओळख होती ती राष्ट्रीय पातळीवर घट्ट होती परंतू विलासरावाच्या जाण्याने ती घडी विस्कळीत झाली आणि लातूरच्या राजकारणात अवकळा पसरली. आजघडीला केवळ देशमूख वगळता नावालाच कॉंग्रेस शिल्लक आहे. त्यात केवळ उल्हास पवार आणी बाळासाहेब थोरात यांच्यावर लातूरची गढी विसंबून असून उद्याच्या काळात कॉंग्रेसकडे भोपळाच शिल्लक राहातो की काय अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तूळातून उमटत असल्याने पक्षश्रेष्ठीने याकडे गांभीर्याने पाहावे लागेल अशी कूजबूज प्रसारमाध्यमातून होताना दिसते आहे तेही नसे थोडके असे वाटते.

एकंदरीत दै.लातूर प्रभात मधून घेतलेल्या आढाव्यानुसार लातूर कॉंग्रेसचा गड पोखरत असतानाच अनुसूचित जातीच्या सावलीतून डॉ. शिवाजी काळगे हे कॉंग्रेसचे खासदार बनले आहेत. त्यानी अशीच जळमठे न पोसता कॉंग्रेसची निधर्मी, पूरोगामी विचारसरणी जोपासून जातीच्या पलिकडे जावून लोकशाही, संविधानानुसार कार्यरत राहावे अशीच लोकभावना प्रकट होत असून सत्य–असत्य काय ते उद्याला समोर येईलच पण भाजपा गेली कॉंग्रेस आली परंतू म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोखावतो आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या रुपाने आधूनिक भस्मासूर भारताच्या मानगुटीवर बसला आहे हे थोतांड भूत कसे परतावता येईल याची काळजी कॉंग्रेस, इंडिया महाविकास आघाडीच्या सुरात सूर मिळवून डॉ. काळगे हे लोकशाही भारतासाठी,लोककल्याणासाठी तत्परत राहातील हीच अपेक्षा !

# गडकरींनी नागपूरचा गड राखला !

१८ व्या लोकसभा निकालांचे कवित्व संपले असून जय पराजयाचे पोस्टमॉर्टेम सुरू झाले आहे. अनेक विद्यमान मंत्र्यांना, दिग्गजांना, सुशिक्षितांना मतदारांनी हिसका दिला आहे तर काहींचे प्राणावर बेतले पण बोटावर निभावले अशी स्थिती झाली आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीने दणदणीत कामगिरी करत तमाम राजकीय पंडितांना उघडे पाडले असून वही होता है जो मंजूर ऐ पब्लिक होता है, हे या निकालावरून दिसून येत आहे. महाविकास आघाडीच्या वावटळीत महायुतीची अनेक संस्थाने खालसा झाली असून विदर्भात तर केवळ इन मिन तिन जागांवर महायुती विजयी झाली आहे.

मुख्य म्हणजे या रणधुमाळीत भाजपचे हेवीवेट नेते आणि केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी यांनी अनेक अडथळ्यांची शर्यत पार केली असून सव्वा लाखाच्या वर मतांनी त्यांनी विजयाची हॅटट्रीक साधली आहे. झाले काय तर मोदी सरकारमधील सर्वाधीक कार्यक्षम आणि ग्लॅमरस मंत्री म्हणून नितीनजी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कामाचा धडाका, कार्याचा व्याप, जनसंपर्क प्रचंड आहे. आसेतुहिमालय त्यांनी महामार्गाचे जे जाळे विणले ते कल्पनातीत आहे. शिवाय आजच्या खुनशी राजकारणातही ते अजातशत्रू म्हणून ओळखले जातात.

आपल्या देशात विकास कामांसाठी पैशाची कमतरता नसून, प्रामाणिकपणे काम करणार्या नेत्यांची कमी आहे याची स्पष्टोक्ती त्यांनी नुकतीच दिली होती. १९९५ ला राज्यात प्रथमच युती सरकार आले असतांना त्यांना बहुदा शिक्षण खाते देण्यात येणार होते. पण विकासाची मनिषा आणि दूरदृष्टी बाळगून असलेल्या नितीनजींनी बांधकाम खात्याचे शिवधनुष्य उचलले. स्व. बाळासाहेबांचे भक्कम पाठबळ लाभताच नितीनजींनी मिळालेल्या संधीचे अक्षरशः सोने केले.

मग ते स्वप्नातला मुंबई पुणे एक्सप्रेस महामार्ग असो की मेळघाट सारख्या दुर्गम, दुर्लक्षीत भागांत मार्गांचे जाळे विणने असो. विशेष म्हणजे नितीनजींच्या या कार्याचे राज्याचे तत्कालीन मा.राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांनी तोंडभरून कौतूक केले होते. बांधकामा सारख्या रूक्ष, रटाळ, उपेक्षित आणि कंटाळवाण्या खात्यात नितीनजींनी प्राण फुंकून ते नंबर वन खाते केले. रस्ते सुंदर दिसू शकतात, महामार्ग विलोभनीय असतात, उड्डाणपूल तुम्हाला मोहीत करू शकतात, शेकडो कि.मी. चा रस्ता प्रवास सुद्धा सुखकर, आरामदायी होऊ शकतो हे नितीनजींनी



आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले. गडकरी ते रोडकरी ही बिरूदावली कमावलेल्या नितीनजी कोरोना काळात देवदूत बनून आले.

वास्तविकतः नितीनजींकडे आरोग्य खात्याचा कारभार नव्हता परंतु त्या काळात प्रचंड अफरातफरी माजली असतांना, जनता हवालदिल झाली असतांना त्यांनी पुढाकार घेत जनतेसह कोरोनाचा मुकाबला केला. पीपीई किट वितरण, रेमडेसीवीर आणि इतर औषधीं उपलब्ध करणे, व्हेंटीलेटर, ऑक्सिजन सिलेंडर, कॉन्सन्ट्रेटर्स मिळवून देणे, ॲम्बुलन्स, कोवीड वॅक्सिनची कमतरता भासू न देणे आदी कामे जनसेवेच्या तळमळीतून केली. सोबतच खासदार हेल्थ कार्ड काढून जनतेला सवलतीच्या दरात उपचार, दिव्यांगांना क्रुत्रिम अंग वितरण, हृदयोपचार, कॅन्सर आदी वैद्यकीय सेवेत सदैव पुढे राहीले. तर क्रीडापटूंसाठी दरवर्षी खासदार क्रीडा महोत्सवाचे ते आयोजन करत आहेत. राहिली बाब नागपूरची तर केंद्र आणि राज्य सरकारची याबाबत नागपूरवर मेहेरनजर आहे. मेट्रो, सिमेंट रस्ते, दहा बारा उड्डाणपूल, रामझुला, विवेकानंद स्मारकाची निर्मिती तर शैक्षणीय क्षेत्रात आयआयएम, लॉ युनिव्हर्सिटी, एम्स सोबत नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटची उभारणी केली. याशिवाय चांदा ते बांदा व्यापार उदीम, आर्थिक आणि प्रवासासाठी राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प सम्रुद्धी महामार्ग प्रत्यक्षात उतरवला. अर्थातच एवढ्या भगीरथ कार्याची पार्श्र्वभुमी असतांना, नितीनजींची विशाल प्रतिमा असतांना मतदारांनी नितीनजींना डोळे झाकून मतदान करायला हवे होते. किंबहुना नागपूरची निवडणूक बिनविरोध व्हायला हवी होती. प्रत्यक्षात उलटेच झाले. सब घोडे बारा टके प्रमाणे इथेही जनतेला उमेदवारांत फरक ओळखता आला नाही.

विकास, प्रगतीचा मुद्दा गौण ठरला. विरोधकांच्या अपप्रचाराला जनता बळी पडली. संविधान, आरक्षण, आर्थिक आमिष, जातपात यांत मतदान विस्कटले. त्यातही मतदानाचा टक्का निराशजनक होता. यापुर्वी दोनदा, दोन लाखांच्या वर निर्णायक लिड घेणारे नितीनजी यावेळी फक्त सव्वा लाखाने निवडून आले. प्रारंभी एकतर्फी वाटणारी लढत अडचणीची ठरली. तरीपण सर्वसाधारण मतदार नितीनजींशी प्रामाणिक राहिला आणि त्यांचे जहाज पैलतिरावर लागले. जवळपास ५४% मते घेत नितीनजी तरले, नागपूरचा गड त्यांनी राखला. मात्र एकंदरीत हा विजय त्यांच्या लौकिकास साजेसा नव्हता. मग तोच विचार येतो, जर नितीनजींना जिंकण्यासाठी एवढे कष्ट पडले तर इतर जागी इतर उमेदवारांना किती पापड बेलावे लागले असतील. एक मात्र खरे, अनेक अग्निदिव्यातून, जातीपातीचे दुष्टचक्र भेदून नितीनजी अखेर जिंकले. निश्र्चितच ते नवीन सरकारची धुरा वाहतांना राज्य आणि देशाला आणखी प्रगतीपथावर नेतील ही अपेक्षा आहे.

डॉ अनिल पावशेकर
मो.९८२२९३९२८७
anilpawshekar159gmail.com

# शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती???.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मसुद्यावर प्रतिक्रिया

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे,यांनी तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मसुद्यावर सागर रामभाऊ तायडे अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य यांनी प्रतिक्रिया नोंदविण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार खालीलप्रमाणे हरकत या पत्राद्वारे लेखी ईमेल द्वारे नोंदविण्यात आली आहे.

इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गीता,मनाचे श्र्लोक आणि मनुस्मृति यांच्या विषमतावादी विचारांचा,धोरणांचा समावेश करणे या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार कलम १३,१४,१७,१९,२१,२८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून व हरकती नोंदविण्यात येत आहे.

आपल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये मनाचे श्र्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे आक्षेपार्ह असून, धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता,स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फासणारी बाब आहे.

तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या संविधानाच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमता वादाचा पुरस्कार व त्याचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश करून गोर–गरीब भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रयत्न स्पष्ट होत आहे.

आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्मांना संरक्षित करत,कलम २८ प्रमाणे आश्र्वस्त केले आहे की, कलम २८ (१) नुसार,पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद आहे,त्यामुळे सरकारकडून कोणत्याही धर्माच्या विचारसरणीच्या बाबी शिकविता येणार नाहीत.

त्याचबरोबर भारतीय संविधानातील कलम १३ (१) नुसार, या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे,ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर,ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत आहे,१३ (२) नुसार राज्य या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करुन केलेला कोणताही कायदा,आदेश,नियम,विनिमय,सूचना,शिक्षण,प्रशिक्षण इत्यादी शून्यवत ठरविले आहेत.असे असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या – विषमतेच्या दिशेने पुन्हा घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते आहे.

वरील पार्श्र्वभूमीवर प्रस्तावित मसुदयामध्ये मनाचे श्र्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार १३,१४,१७,१९,२१,२८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या बाबी रद्द कराव्यात आणि संविधानाची प्रास्ताविका,अनुछेद १३ ते ३२ पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्यें या मूल्यांचा समावेश करावे की ज्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधी जागृत होतील.तेच देश हितकारक आहे.

वरीलप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास स्वतंत्र मजदुर युनियन महाराष्ट्र राज्य आणि संलग्न विविध संघटनांच्या वतीने महाराष्ट्र भरामध्ये तीव्र स्वरूपाचे पडसाद उमटतील आणि उग्र आंदोलन छेडण्यात येतील त्याची संपुर्ण जबाबदारी आपली असेल,याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

जय संविधान ! जय भारत !!

सागर रामभाऊ तायडे.
९९२०४०३८५९,शारळश्र:–
srt1961gmail.com
अध्यक्ष स्वतंत्र मजदुर युनियन महाराष्ट्र राज्य.

# लोकशाहीचा विजय

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव अर्थात लोकसभा निवडणूक नुकतीच पार पडली आणि या लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला जाहीर झाला. देशातील जवळपास १०० कोटी मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्सवात हिरीरीने भाग घेऊन आपला लोकप्रतिनिधी अर्थात खासदार निवडला.

या निवडणुकीत भाजपप्रणीत एनडीए आणि कॉंग्रेसप्रणीत इंडिया आघाडी यांच्यात मुख्य लढत झाली. निवडणूकपूर्व आणि निकडणुकिनंतर विविध माध्यमांनी केलेल्या सर्व्हे त भाजप प्रणित एनडीएला ३५० जागा मिळण्याचा आणि भाजपला ३०० जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला होता अनेक जाणकारांनी देखील तसाच अंदाज व्यक्त केला होता मात्र प्रत्यक्ष हाती आलेला निकाल हा सर्वांना अचंबित करणारा ठरला आणि एकट्याच्या जोरावर बहुमतात येण्याची स्वप्न पाहणाऱ्या भाजपला २४० जागाच मिळाल्या तर मित्र पक्षांसह भाजप कसाबसा बहुमताचा आकडा पार करू शकला.

ज्या कॉंग्रेसला आणि इंडियाला कोणीच जमेस धरले नव्हते त्या कॉंग्रेसने जवळपास १०० जागा जिंकल्या तर इंडिया आघाडीने २४० जागा जिंकून सर्वांना अचंबित केले अर्थात असा निकाल लागेल असा अंदाज जरी जाणकारांना नसला तरी मतदारांच्या बोलण्यातून असाच कौल येईल असे वाटत होते कारण सरकारच्या मागच्या पाच वर्षाच्या कामगिरीवर मतदार नाराज होते. शेतकरी, तरुण महिलांमध्ये मोदी सरकारच्या धोरणावर प्रचंड नाराजी दिसत होती त्यात भाजपने जो यंत्रणांचा गैरवापर केला त्यामुळेही मतदार चिडून होता. सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादी या पक्षात भाजपने पाडलेली फूट देखील मतदारांना आवडली नाही.

२०१४ साली मोदींनी ना खाऊंगा... ना खाने दुंगा... हा दिलेला नारा मतदारांना भावला होता. मोदी साहेब देशातील भ्रष्टाचार उखडून टाकतील आणि भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात पाठवतील असा विश्र्वास मतदारांना होता मात्र भाजपने आणि खुद्द मोदींनी ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते त्याच भ्रष्ट नेत्यांना भाजपने आपल्या पक्षात प्रवेश देऊन पावन करून घेतले हे मतदारांना रुचले नाही. मोदी सरकारचे शेती विषयक धोरण शेतकऱ्यांना मान्य नव्हते हे ही निकालातून स्पष्ट झाले. देशात प्रचंड बेरोजगारी आहे. तरुणांच्या हातात उच्च शिक्षण घेतल्याची डिग्री आहे मात्र रोजगार नाही विशेष मागील पाच वर्षात रोजगार वाढवण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल सरकारकडून उचलले गेले नाही याचाही फटका भाजपला बसला. महागाई रोखण्यात मोदी सरकार अपयशी ठरले त्याचेही प्रतिबिंब निकालात उमटले. भाजपच्या उत्तर भारतातील काही नेत्यांनी ४०० पार झालो तर घटना बदलू अशी आत्मघातकी विधाने केली ती विधाने सोशल मीडियावर व्हायरल देखील झाली.

कारण नसताना भाजपच्या काही बोलबच्चन नेत्यांनी केलेली अशी विधाने भाजपच्या अंगलट आली या आणि अशा अनेक कारणांनी जनतेच्या मनात भाजप विषयी नाराजी निर्माण झाली. जनतेच्या मनात आपल्या विषयी नाराजी आहे याची कल्पना भाजपमधील धुरिणांना आली होती म्हणूनच भाजपने प्रचार अन्य मुद्द्यांवर भरकटवण्याच्या प्रयत्न केला मात्र मतदारांनी त्याकडे लक्ष न देता मतदान केले या सर्वांचा परिपाक म्हणजे ४०० पार ची स्वप्ने पाहणारा भाजप ३०० पार ही होऊ शकला नाही. सरकार विषयी जनतेच्या मनातील ही नाराजी कॉंग्रेसने हेरली. राहुल गांधींनी देशभर भारत जोडो यात्रा काढून जनतेला विश्र्वास दिला. स्वतः कमीपणा घेऊन इंडिया आघाडीतील घटक पक्षांना मोठेपणा दिला.

अनेक राज्यात मुख्यपक्ष असूनही मित्र पक्षांना अधिक जागा देऊन दुय्यम स्थान स्वीकारले. इतिहासात पहिल्यांदाच कॉंग्रेसने सर्वात कमी जागा लढवल्या हे करताना मित्र पक्षांचा मान सन्मान राखला. त्यामुळे इंडिया आघाडी शेवटपर्यंत एकत्र राहिली त्याचा फायदा त्यांना झाला. ज्या इंडिया आघडीला दीडशे जागाही मिळणार नाही असे म्हंटले जात होते त्या इंडिया आघडीने २४० जागा मिळवल्या. मागील दहा वर्षात देशात विरोधीपक्ष नाममात्र देखील नव्हता आता मात्र देशाला विरोधी प्रबळ पक्ष मिळाला आहे. प्रबळ विरोधी पक्ष असणे हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे. प्रबळ विरोधी पक्ष असल्यास सरकारला मनमानी करता येत नाही. मागील दहा वर्षात भाजपने जशी मनमानी केली तशी त्यांना यावेळी करता येणार नाही.

आता नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान बनतील तर राहुल गांधी विरोधीपक्षनेते बनतील. दोघानीही आपल्या पदाची प्रतिष्ठा राखून आपली जबाबदारी पूर्ण केली तर भारताची लोकशाही आणखी सुदृढ होईल आणि जनतेचा लोकशाहीवरील विश्र्वास आणखी वाढेल. या निवडणुकीत कोण जिंकले कोण हरले असे जर कोणी विचारले तर माझे उत्तर असेल या निवडणुकीत कोणीही जिंकले नाही कोणीही हरले नाही. या निवडणुकीत जिंकली ती भारताची लोकशाही. ही लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम या देशातील मतदारांनी केले त्याबद्दल या १०० कोटी मतदारांचे मनापासून आभार आणि जिंकून आलेल्या सर्व पक्षांच्या सर्व खासदारांचे मनापासून अभिनंदन!

आता झाले गेले विसरून सर्वांनी एकत्र येऊन भारताला महाशक्ती बनवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. प्रत्येकाने आपापली जबाबदारी पार पाडली तर भारत भविष्यात नक्कीच महाशक्ती बनेल यात शंका नाही

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

## उपदेशकथा सुख

कोही प्राणीकथा आपल्याला खूप मोठा बोध करून जातात. फक्त तो समजण्याची दृष्टी हवी, नजर हवी. रावसाहेब असेच गच्चीत बसलेले असतानाची गोष्ट. त्यांच्या समोरील भिंतीवर एक मधाचे भांडे ठेवलेले होते. कुठून कोण जाणे पण त्या मधाच्या वासाने तिथे गांधीलमाशा येऊ लागल्या. भांड्याच्या काठावर बसून त्या मधाचा आस्वाद घेऊ लागल्या. रावसाहेबांनी प्रथम त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पण त्या जसजशा वाढू लागल्या तसतशी त्यांची दखल घेणे त्यांना आवश्यक वाटले म्हणून ते भांड्याजवळ गेले. त्या माशांना उडवून लावू लागले पण त्या उडेनात. त्यांनी बारकाईनं पाहिलं तेव्हा त्यांना दिसलं की, त्या माशांचे पंख मधाच्या भाड्याला चिकटून बसले आहेत. मध खाताना हा धोका माशांच्या लक्षातच आला नव्हता. मध खाण्याच्या सुखात त्या गुरफटून गेल्या होत्या आणि आपले पंख गमावून बसल्या.

कथा उपदेश : भौतिक सुखात असा एकदा का माणूस गुरफटला की, त्याचेही पंख कापले जातात. मानसिक शांतीला पारखा होतो. एका अर्थाने सुखोपभोगाने तो अपंग होतो.

# इतर कपड्यांसोबत कधीच धुवू नका अंडरगार्मेंटर्स

कपडे धुताना अनेक गोष्टी आहेत ज्या आपण फॉलो करतो. त्यात पांढरे कपडे वेगळे धुवावे आणि कलरफूल कपडे वेगळे धुवावे. पण त्यातही अनेकदा कलरफूल कपड्यांमध्ये एक गोष्ट येते ती म्हणजे कोणते कपडे एकत्र धुवावे. हे सगळे नियम अनेकांना ठावूकही नसतात. आज आपण त्याविषयीच जाणून घेऊया... आपण सर्वसाधारणपणे धुण्याचे जे कपडे असतात ते एकाच बादलीत भिजत घालतो. इतकंच नाही तर आपण मशीनमध्ये देखील आपण हे कपडे एकत्रच धुवायला घालतो. त्यामुळे काही कपड्यांचा रंग दुसऱ्या कपड्यांना लागतो. अनेक लोक तर अंडरवेअर किंवा अंडर गार्मेंटर्स किंवा पॅन्टीज या एकत्र धुतात.

आपल्यापैकी बरेच जण अजूनही अंडरवेअर इतर कपड्यांसोबतच एकत्र धूत असाल, पण तुम्हाला माहित आहे असं करणं अगदी चुकीचं आहे. आता अनेकांना प्रश्न पडला असेल की असं का? अंडरवेअर नेहमी वेगळीच का धुतली पाहिजे? चला तर जाणून घेऊया... काय आहे त्या मागचं कारण... एका स्टडीमधून एक गोष्ट समोर आली आहे आणि ती म्हणजे जी कोणत्याही अंडरवेअरमध्ये दिवसाला १० ग्रॅम घाण जमा होऊ शकते, इतर कपड्यांवर होणाऱ्या घाणीच्या तुलनेत ती सगळ्यात जास्त हानिकारक असते. अशात जर तुम्ही ती अंडरवेअर इतर कपड्यांसोबत धुतली तर त्यानं तुम्हाला किती इनफेक्शन होण्याची शक्यता आहे याचा विचार करा.

त्या रिसर्चमधुन आणखी एक गोष्ट समोर आली आहे आणि ती म्हणजे, ज्या पाण्यात धुतली जाते त्या पाण्यात सुमारे १०० दशलक्ष एस्चेरिचिया कोलाई आणि स्टॅफिलोकोकस



ऑरियस बॅक्टेरिया असू शकतात. ज्यामुळे संसर्ग होण्याची शक्याता वाढते. याशिवाय इतर मळक्या कपड्यांसोबत अंडरवेअर धुतल्याने त्या पाण्यात १०० दशलक्ष ए. लेश्रळ (ऐलहशीळलहळर लेश्रळ) पसरू शकतात, ज्यामुळे तुम्हाला संसर्ग होण्याचा धोका आणखी वाढतो.

कशी धुवाल अंडरवेअर?

आता कामं सोपी करण्यासाठी ऑटोमॅटिक वॉशिंग मशिन सर्रास वापरली जाते. कपडे धुवून सुकून निघतात. गृहिणींचा बराच वेळ या मशिनमुळे वाचतो. पण तुम्हाला एक गोष्ट माहित आहे का? की ज्या पाण्यानं आपण कपडे धुतो त्या पाण्याचं तापमानं हे एक ठराविक सेल्सिअस असायला हवं. पाण्याचं तापमान १५ डिग्री सेल्सिअस असेल तर ते पाणी कपडे धुण्यासाठी योग्य आहे. पण आपण एवढा विचार कधीच केला नाही. दिवसभर आपण जे कपडे घालून प्रवास करतो त्यात किती धूळ आणि घाण अडकते. त्यामुळेच हे कपडे विशेष तापमानातच धुतले पाहिजे. तर अंडरवेअर धुण्यासाठी ४० डिग्री सेल्सिअस तापमाण असायला हवे. अंडरवेअर धुण्यासाठी डिटर्जेंट सोबत ब्लिचचा वापर करा आणि तेही गरम पाण्यात. तेव्हाच ते स्वच्छ धुतले जातील आणि संसर्ग पसरवणारे जंतू मरून जातील.

## 'राजमाता जिजामाता'त गुणवंतांचा गौरव

लातूर, – येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील



विविध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व पालकांचा संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शुक्रवारी शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य जी. आर. मुंडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. आर. धुमाळ, प्रा. वैशाली पाटील, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. नभा लहाने यांनी केले.

यावेळी बारावी परीक्षेत ९५.६७ टक्के गुण घेतलेला प्रज्वल विष्णू कराड, ८६.०० टक्के गुण मिळविलेला भूषण मिलिंद घरटे व ८४.३३ टक्के गुण मिळवलेल्या इशिता अरविंद खोत यांचा, 'नीट' परीक्षेत यश मिळविलेला भूषण मिलिंद घरटे (६९२), विशाल राजाराम गांगड (६६५), साहिल अजय नायक (६२५), महेश माधव नागरगोजे (६११), श्रुती दयानंद बद्दे (६००), जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरलेले मंथन दीपक पालकर (९५.४०), विनित तुशीकांत सांगोले (९४.०५), आदित्य संजय चव्हाण (९३.२६) व समर्थ तानाजी भोसले (९०.००) यांचे कौतुक करण्यात आले.

तुळजाभवानी उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी परीक्षेत ८३.३३ टक्के गुण मिळवलेला साहिल नबी शेख, ७५.६७ टक्के गुण मिळवलेली श्रावणी राजेंद्र सूर्यवंशी व ७५.१७ टक्के गुण मिळविलेल्या सिध्दी सागर भराडिया, 'नीट' परीक्षेत यश मिळविलेला गौरव गुंडाजीबापू मोरे (६३१), सिध्दी सागर भराडिया (५६६), साहिल नबी शेख (४९७) व जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरलेल्या पार्थ दत्ता कुलकर्णी (९२.५) यांचे कौतुक करण्यात आले.

### 'मला तिच्याबद्दल सहानुभूती..', कंगनाला CISF जवानानं कानशिलात लगावल्याप्रकरणी पहिल्यांदाच बोलले संजय राऊत

मुंबई : बॉलिवूड अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौतसोबत चंडीगढ विमानतळावर अनपेक्षित घटना घडली आहे. त्यानंतर सोशल मीडियावर या प्रकरणात खूप चर्चा सुरु झाली होती. तर या प्रकरणात आता संजय राऊत यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

कंगनानं या प्रकरणीनं व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओत कंगनानं घडलेल्या संपूर्ण प्रकरणाविषयी सांगितलं होतं. कंगनाचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर त्यावर नेटकरी त्यांची प्रतिक्रिया देताना दिसले. इतकंच नाही तर आता स्वतः संजय राऊत यांनी देखील या प्रकरणावर त्यांची प्रतिक्रिया मांडली आहे.

यावेळी संजय राऊत म्हणाले की 'जर त्या कॉन्स्टेबलनं असं सांगितलं असेल की तिची आई तिथे बसली होती, तर ते खरं आहे. तिची आई शेतकरी आंदोलनात सहभागी झाली असेल आणि अशात आईबद्दल कोणी चुकीचं बोलत असेल तर नक्कीच लोकांच्या मनात चीड येते, संताप येतो, क्रोध असतो. जर मोदीजी म्हणतात की कायद्याचं राज्य आहे तर कायदा हातात नाही घेतला पाहिजे. कॉन्स्टेबलनं तिच्या आईसाठी कायदा हातात घेतला. भारत मातासुद्धा त्यांची आई आहे आणि जे शेतकरी आंदोलनाला बसले होते, ते भारतमातेचे पुत्र होते, कन्या होत्या. जर कोणी भारतमातेचा अपमान केला असेल आणि कोणाला राग आला असेल तर मला असं वाटतं की त्याविषयी विचार केला पाहिजे. मला कंगनासाठी सहानुभूती आहे. त्या खासदार आहेत, अशा प्रकारे खासदारांवर कोणी हात उचलू नये, तर देशात शेतकऱ्यांचा सन्मान झाला पाहिजे.'

# 'हे' खाल्ल्याने तुमची स्मरणशक्ती मजबूत होईल

फळे, भाज्या, चहा, वाईनमध्ये ॲंटिऑक्सिडंट फ्लेव्होनॉल आढळतात. रश युनिव्हर्सिटीच्या संशोधनात असे दिसून आले आहे की, ते स्मरणशक्ती कमी होण्यास प्रतिबंध करतात. फ्लेव्होनॉल्स हे वनस्पतींमध्ये आरोग्यास प्रोत्साहन देणाऱ्या फ्लेव्होनॉइडच्या कुटुंबातील आहेत. लिंगभेद, वृद्धत्व, धूम्रपान यासारख्या कारणांमुळे लोकांची स्मरणशक्ती कमी होते. संशोधक थॉमस हॉलंड यांनी उघड केले की, जे लोक फ्लेव्होनॉल युक्त फळे आणि भाज्यांनी समृद्ध आहार घेतात त्यांची स्मरणशक्ती कमी होण्याचे प्रमाण इतरांपेक्षा कमी होते. त्यांनी स्पष्ट केले की, याचे कारण फ्लेव्होनॉलचे ॲंटिऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत.

पौष्टिक पदार्थांचा अभाव, वाढते वय या कारणांमुळेही स्मरणशक्ती कमी होते. स्मरणशक्ती वाढवण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय खालीलप्रमाणे:

१. फॉलिक अ?ॅसिड आणि व्हिटॅमिन: फळे आणि हिरव्या भाज्यांचे सेवन केल्यास मेंदूच्या रक्त नलिका मजबूत आणि लवचिक होतात. फॉलिक अ?ॅसिड हे यापैकी एक आहे. याची शरीरात कमतरता निर्माण झाल्यास थकवा, चिडचिड, राग, अशक्तपणा आणि एनीमिया यासारख्या समस्या उद्भवू शकतात. यासाठी इतर जीवनसत्त्वे आणि खनिजांप्रमाणेच शरीरातील फॉलिक अ?ॅसिड म्हणजेच व्हिटॅमिन-बी ९ ची कमतरताही पूर्ण होणे आणि रायबोफ्लाविनमुळे अल्झायमरसारखे आजार



(आवश्यक आहे.डोक्याला फॉलिक अ?ॅसिड आणि व्हिटॅमिन मिळाल्याने स्मरणशक्ती वाढते. वांगी खाल्ल्यानेही फायदा होतो. २. बदामाचे सेवन करा: नियमित बदाम सेवन केल्याने स्मरणशक्ती वाढते. बदामामध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन, फायबर आणि ओमेगा ३ हे घटक आहेत. बदामामध्ये प्रथिने, ॲंटी-ऑक्सिडंटसही असतात. शिवाय कॅलरीचे प्रमाण कमी असते. यातील प्रोटीन, मॅगनीज, कॉपर दूर राहतात. रोज रात्री ५ बदाम भिजवा. सकाळी उठल्यावर ते खा. ३. रोज आठ तास झोप घ्या: चांगल्या झोपेमुळे स्मरणशक्ती कायम ठेवण्याच्या क्षमतेची वाढ होते. ४. नियमित ध्यान, प्राणायाम आणि व्यायाम केल्याने तणाव दूर होतो. आत्मविश्वास वाढतो. एकाग्रता वाढते आणि मेंदूला योग्य प्रमाणात ऑक्सिजन, रक्त आणि पोषक तत्व मिळतात. यामुळे स्मरणशक्ती वाढते.

### शरद पवार गटात यायचच असेल तर...; रोहित पवारांचा 'त्या' आमदारांना इशारा

मुंबई : लोकसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीने दमदार मुसंडी मारली आहे. तर, महायुतीला मोठा फटका बसला आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीला मोठे यश मिळाल्यानंतर आता अजित पवार गटाचे अनेक आमदार शरद पवार गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीच्या बैठकीलाही पाच आमदारांनी दांडी मारली असल्याची माहिती समोर आली होती. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी थेट इशारा दिला आहे. रोहित पवार यांनी आज प्रसारमाध्यमांसोबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी म्हटलं आहे की, अजित पवार गटाचे आमदार १५ दिवसांत परत येतील.आमदार येणार ही फक्त आता चर्चा राहणार नाही, असं विधान पुन्हा रोहित पवारांनी केलं आहे. परत येणा-या आमदारांनी यायला उशीर केला तर त्यांना न्याय देता येणार नाही, असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे. त्यामुळे अजित पवारांच्या आमदारांची घरवापसी होणार असल्याच्या चर्चेला अधिक बळ मिळालं आहे. काही आमदार खरंच चांगले आहेत परत ते येतील तेव्हा त्यांचं स्वागतच आपण केलं पाहिजे. पण इथं आपण काही उमेदवार तयार करत आहोत. त्याबाबतीत काय होईल हे बघावं लागेल. त्यामुळं तिथे अजित पवार गटातील आमदारांनी आणखी उशीर केला आणि नवीन काही चेहरे पुढे आणले तर मग येणाऱ्या आमदारांना न्याय देता येणार नाही. म्हणून १५ दिवसांत जे काही होईल ते होणार आहे. त्यामुळं १५ दिवसांच्या पुढे गेले तर आम्हाला कदाचित घेता येणार नाही. कारण तिथे नवीन चेहरे दिले जातील, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

## त्यांच्या वाणीतून....

नमस्कार मित्रांनो, मला फार फोन कॉल येत आहेत. शुभचिंतक आणि मीडियातील लोक माझ्यासी संपर्क करत आहेत. सर्वात पहिल्यांदा सांगते की, मी सुरक्षित आहेत. आज जो प्रसंग झाला. तो सेक्युरिटी चेक जवळ झाला. मी तिथून जात असताना दुसऱ्या कॅबिनमधील एक महिला होती जी सीआयएसएफची सुरक्षा कर्मचारी होती. तिने मला क्रॉस करण्याची वाट पाहिली. त्यानंतर ती माझ्यासमोर आली आणि माझ्या कानशिलात लगावली. त्यानंतर मला ती शिव्या देखील देत होती. मी तिला विचारले की, तिने असे का केले? तेव्हा तिने सांगितले की, मी शेतकरी आंदोलनाला सपोर्ट करते. मला आता पंजाबमध्ये वाढणाऱ्या आंतकवादाबद्दल चिंता वाटू लागली आहे.

– अभिनेत्री कंगना राणौत

जर पिपाणी नसती तर आमची साताऱ्याचीही सीट आली असती. दिंडोरीतही पिपाणीला मते पडली आहेत. हा रडीचा डाव आहे, दुसरे काही नाही. मी दहा वर्षे भाजपचे सरकार पाहिले आहे.

– राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे

# (गुरु वचन)
# प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला माझ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले. हेच पुरेसे आहे. मी तिच्यासाठी कैदखाना बनत नाही. तिने माझ्यावर प्रेम केले व बदल्यात मी तिच्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? मी तिच्यावर प्रेम केले व बदल्यात ती माझ्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? आम्ही एकमेकांना चांगला पुरस्कार देत आहोत.

जर मी कुणावर प्रेम करतो तेव्हा मी तिचा कृतज्ञ असतो व तिचे स्वातंत्र्य कायम असते. मी तिला स्वातंत्र्य दिले नाही. हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे व माझे प्रेम तिचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही. तुमचे प्रेम असलेल्या व्यक्तीकडून तुम्ही तिचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकता? मी तिला स्वातंत्र्य देतो असे सुद्धा तुम्ही म्हणू शकत नाही. तुम्ही कोण आहात? एक अनोळखी. तुम्ही दोघे योगायोगाने रस्त्यावर भेटले व तो महान आहे की, त्याने तुमचे प्रेम स्वीकारले. त्याच्याप्रती कृतज्ञ रहा व ज्याप्रमाणे जगू इच्छिता त्याप्रमाणे त्यास जगू द्या व तुम्हाला जसे जगायचे असेल तर जीवन जगा. तुमच्या जीवनशैलीत कुणी हस्तक्षेप करणार नाही. यास स्वातंत्र्य म्हणतात. तेव्हा प्रेम कमी तणावपूर्ण, कमी चिंताग्रस्त, कमी क्रुद्ध व जास्त प्रसन्न होण्यास मदतगार ठरेल.

जगात नेमके याउलट होत आहे. प्रेम खुप दु:खदायी असते व असेही लोक आहेत जे अखेरीस कुणावरही प्रेम न चांगले असा निर्णय घेतात. ते आपल्या मनाचे दरवाजे बंद करतात.

पण प्रेमासाठी दरवाजा बंद करण्याचा अर्थ वास्तविकतेकडे, अस्तित्वाकडे पाठ फिरवणे आहे म्हणून मी याचे समर्थन करणार नाही. मी म्हणेन की, प्रेमाचे संपूर्ण स्वरूप बदला.

## राशी भविष्य ०८ जून २०२४

मेष : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल. कोणाचाही राग करू नका.

मिथुन : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम
कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल. नातेवाईकांशी मर्यादित संबंध ठेवा.

कर्क : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पुर्व
प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

सिंह : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर
आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल. वाईट सवयीपासून दूर रहा. व्यापारात नवीन संबंध जुळतील.

कन्या : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर
उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील. प्रतिस्पर्ध्यांमुळे उत्साहात वाढ होईल.

तुळ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

धनु : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व
मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

मकर: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका. व्यापार व्यवसाय चांगला राहील.

कुंभ : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पुर्व
न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**निदिध्यास ..**

यश ना मना सारखे
वेदना छळते मनांस
चुका आपल्या पहा
दोष का देई जनांस
शोधा सारे बारकावे
सखोल करे अभ्यास
सर्व बाजूंचा विचार
पुनरुक्ति निदिध्यास
लहान मोठ्या गोष्टी
संपूर्ण करे अनुध्यास
तपासे आपले प्रमाद
नडला का रे हव्यास
कधी सांगावे कुणांस
मिळेका विनासायास
कधी पडतोयंआडवा
काअतिआत्मविश्र्वास
अपयश सु यशासाठी
असे सार्थ शिलान्यास
हार स्विकारी सन्माने
यशअरूण ये उदयास
अडथळ्यांचे शर्यतीत
घेतात काही संन्यास
जे लढतातसामर्थ्याने
स शक्त क्रियोपन्यास

२

**भूतकाळ ..**

नेत्यांनो आठवा बा
कधी तरी भूतकाळ
हवेत उडणे नसावे
उगा सदा सर्वकाळ
सत्ता पक्षात असता
गळा विजयश्रीमाळ
आम्हीअमूक केलेले
बडवत बसलो टाळ
विसरुन जातो कसे
बोलायचे वस्त्र गाळ
पाय घालतो स्वताचं
दिसून समोरचं गाळ
प्रमाद असूनआपले
दुस-यां घाली आळ
सत्ता जाता हातातून
करत बसतो कुटाळ
अपयश पचवा शिके
सोसा नांगराचे फाळ
मातीतून फुले कोंब
वरुन पाहते आभाळ
करावे सिंहावलोकन
सुधारावे कार्य काळ
पूर्वाभिमुख बनायचे
येणारं परत सुकाळ

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६...**

## स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजचे नीट परीक्षेत दैदिप्यमान यश

लातूर : जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज एमआयडीसी, लातूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवत पाच विद्यार्थ्यांनी यशस्वी भरारी घेऊन स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजचा नावलौकिक वाढविण्याचे काम केलेले आहे. यामध्ये स्वामी विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील रामनिवास मगर या विद्यार्थ्यांने ६६० गुण, राहुल खराटे ६१७, उन्मेश्वर राठोड ६१४, गौरी राठोड ५९३ तर वृषाली गुडसुरे या विद्यार्थीनीने ५८७ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या नीट परीक्षेतील यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, शै.समन्वयक संभाजीराव पाटील, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपप्राचार्य मनोज गायकवाड, उपप्राचार्य विठ्ठल चेवले, उपप्राचार्य संजय अंकुश यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### कपिल पाटील यांच्या पराभवामुळे आलेल्या नैराश्यातून ...

**(पान १ वरुन) :** त्यांनी शहापूर तालुका पिंजून काढला होता. मतमोजणीच्या दिवशी कपील पाटील यांचे पक्ष प्रतिनिधी म्हणून संजय अधिकारी यांना ओळखपत्र मिळाले होते. पण मतमोजणीच्या दिवशी ते गैरहजर राहिले. त्यानंतर कपील पाटील पराभूत झाल्याची माहिती मिळताच, संजय खूप व्यथित झाले. हा पराभव त्यांच्या जिव्हारी लागला.रात्रीच्या वेळेत मित्रांसोबत चर्चा करत असताना आता जगण्यात काही अर्थ नाही, अशी भाषा त्यांनी केली होती. मित्रांनी त्यांना समजावले होते. असे टोकाचे पाऊन न उचलण्याचे सूचित केले होते. बुधवारी रात्री पत्नी, त्याची दोन मुले घरात झोपी गेल्यानंतर संजयने राहत्या घरात गळफास घेतला. सकाळी हा प्रकार उघडकीला आला.

आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांची माहिती मिळताच कपिल पाटील यांचे कौटुंबिक सदस्य देवेश पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी अधिकारी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

# विश्र्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल!

विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा विश्र्वकर्मीय सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांकडे ओबीसी संदर्भात जर दूरदृष्टी,निश्र्चित दिशा आणि ठोस कृती कार्यक्रम नसेल,समाज प्रबोधनात्मक शिवधनुष्य पेलता येत नसेल तर नैतिक मूल्यांचे,नैतिक धर्माचे पालन करावे आणि स्वतःला समाज नेतृत्व म्हणवून घेऊ नये.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व म्हणून जर नैतिक जबाबदारी समजत नसेल तर स्वतःच्या नावासाठी आणि मोठेपणासाठी उतावीळपणा करून संपूर्ण विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करु नये.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात ओबीसींसाठी तरतूद केलेली असून विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक आधारावर ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांना याचा विसर पडू नये.

विश्र्वकर्मीय सुतार समाज मुळातच बहुजन समूहातीलच ओबीसी घटक आहे याबाबत समाजात समाज जागृती अजिबात नाही त्यामुळे समाज अनभिज्ञ आहे.मी एक विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बांधव असून माझ्याकडे माझ्या जातीचा दाखला असून ओबीसी सुतार अशी सरकार दप्तरी नोंद आहे.ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी प्राप्त करण्यासाठी विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या,स्वतःलाच संपूर्ण ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व समजणाऱ्या सर्वच स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यातील कानाकोपऱ्यात खेडोपाडी गावागावात,वाडीवस्तीमध्ये प्रत्येक नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी,संविधान,जनगणना, आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला दिशाहीन आणि फक्त नेतेगिरी करण्यासाठीच उतावीळ झालेले समाज नेते लाभले तर मात्र विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

ओबीसी,आरक्षण संदर्भात राज्यातील अनेक ओबीसी संघटना आणि ओबीसी संघटनांचे नेते,कार्यकर्ते,पदाधिकारी विविध पातळीवर आपापल्या परीने ओबीसींच्या हक्काच्या लढाईत उतरलेले असतांना मात्र ओबीसी सुतार समाजातील स्वतःला समाजाचे नेतृत्व म्हणवून घेणारे तथाकथित समाज नेते ओबीसींच्या लढाईत कुठेही उतरतांना दिसत नाहीत.समाजातील कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात स्पेशल ओबीसी,जनगणना,आरक्षण, सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन केल्याचे पुराव्यानिशी कोणालाही सिद्ध करता येणार नाही.हिच सत्य परिस्थिती समाजात असतांना मग या स्वयंघोषित नेत्यांना विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेते म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार आहे काय याचा सुद्धा समाजाने विचार करण्याची नितांत गरज आहे यासाठी समाजाने सुद्धा जागरूक असणे गरजेचे आहे.

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडल्यास समाजातील ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता संपत्ती ज्ञान,राजकीय हिस्सेदारी इत्यादी महत्वपूर्ण विषयाच्या बाबतीत निष्क्रिय आणि दिशाहीन तसेच कर्तृत्वशून्य समाज नेते समाजात फक्त स्वतःच्या नावासाठी मोठेपणासाठी समाज नेतृत्वपदाचा खोटेपणाचा गवगवा करतात हे सिद्ध होईल.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन अर्थात ओबीसी विचारधारे पासून दूर गेल्यास समाजात नेतेगिरी करणारे,नेतेगिरीसाठी उतावीळ झालेले,समाज नेतेगिरीचं बाशिंग गुडघ्याला बांधलेले,नेतेगिरीच्या थाटात आणि समाज नेतेगिरीच्या रुबाबात वावरणारे समाजातील सर्वच तथाकथित स्वयंघोषित समाज नेते याला प्रामुख्याने जबाबदार असतील हे मी विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचा एक घटक म्हणून जबाबदारी पूर्वकच लिहीतो आणि तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा करण्यास सुद्धा तयार आहे.

विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे,स्वतःला समाजाचे कैवारी,समाजाचे तारणहार समजणारे,स्वतःला समाजाचे प्रमुख समजणारे,स्वतःला समाजाचे नेतृत्व समजणारे समाजाला योग्य वैचारिक मार्गावर घेऊन जाण्यासाठी,समाजाला योग्य दिशा देण्यासाठी संबंधित समाज नेतृत्व सर्वगुणसंपन्न गुणवत्तापूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान शिवाय सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने दिशादर्शक भूमिकेत वावरणारे असणे गरजेचे असते.कारण संपूर्ण समाजाची सामाजिक सर्वांगीण विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक जबाबदारी नैतिक दृष्टीने समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांच्याच खांद्यावर असते.समाजाची दिशाभूल होऊ नये यासाठी समाजातील सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान समाज बांधवांनी,सर्वसामान्य समाज बांधवांनी जागरूक असणे गरजेचे अन्यथा समाजाची दिशाभूल झाल्या शिवाय राहणार नाही आणि समाजाच्या डोक्यावर स्वयंघोषित नेतेगिरीचं ओझं कायमस्वरूपी लादल्या जाईल.जर समाजात नेतेगिरी करणारे दिशाहीन असतील तर मात्र विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत समाजातील कोणत्याही सामाजिक संघटना आणि कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांनी सुतार समाजाची मात्र दिशाभूल करु नये.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात ५० लाखापेक्षा अधिक असल्याचे सोशल मीडियावर वाचण्यात आले आहे.वास्तविक पाहता समाजाची लोकसंख्या राज्यात नेमकी किती लाख,किती कोटी आहे या बाबतीत शासकीय यंत्रणे मार्फत जनगणनेच्या संदर्भात कोणताही ठोस अहवाल कोणाकडेही नाही.कारण ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालेली नाही.त्यामुळे विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत कोणत्याही सामाजिक संघटनेवर कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांवर समाजाने अजिबात विश्र्वास ठेऊ नये.समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत थातुरमातुर संभ्रम निर्माण करणारी आकडेवारी असून विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची निव्वळ दिशाभूल करणारी आहे.

विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा साज चढविलेल्या किमान २०० च्या जवळपास सामाजिक संघटना,संस्था विविध प्रकारचे विकास मंच कार्यरत आहेत.राज्यातील ३६ जिल्ह्यातील जवळजवळ ३६० तालुक्यात विश्र्वकर्मीय सुतार समाज विस्तारित आहे आणि राज्यभरात विविध राज्यस्तरीय सामाजिक संघटना कार्यरत आहेत.याच संघटनांच्या माध्यमातून समाजात विविध विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात असा संकेत समाजाला दिला जातो.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक संघटनेचे जबाबदार अध्यक्ष आणि विविध पातळीवर पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात येते.या मधूनच विश्र्वकर्मीय सुतार समाजात कर्तबगार,कर्तृत्ववान,कार्यसम्राट,समाज कैवारी,समाज तारणहार,समाज प्रमुख,समाज भूषण,समाजरत्न आणि असंख्य समाज नेतृत्व तर काही धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणुन उदयास येत असतात.विशेषतः अशा पध्दतीने अत्यंत मानाच्या आणि सन्मानजनक उपाध्या नावासोबत जोडण्यासाठी विशिष्ट मूल्यांकन,मूल्यमापन पध्दत आणि कोणताही निश्र्चित मापदंड अस्तित्वात नाही.तरीही समाजात अशा पध्दतीने बिरुदावली जोडली जात असेल तर याला मात्र विश्र्वनिर्मात्याची विश्र्वकर्मीय चमत्कारिक देणगी म्हणावी लागेल.

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे याबाबतीत ज्यांना समाजात छातीठोकपणे जाहीर भाष्य करता येत नाही आणि ओबीसी संदर्भात समाजात राज्यभरात ठिकठिकाणी समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करता येत नाहीत अशा लोकांनी समाजात मोठ्या दिमाखात समाज नेतेगिरी करावी हि सुद्धा एक हास्यास्पद आणि आश्र्चर्यकारक बाब म्हणावी लागेल याचे एकमेव कारण म्हणजे समाजात समाज जागृतीचा अभाव जाणवतो.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे समाज नेतेच जर दिशाहीन असतील तर मात्र विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल हे मी एक सर्वसामान्य ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून जबाबदारी पूर्वकच लिहोतो.

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असतांना सुतार समाजात ओबीसी बद्दल समाज जागृती होतांना दिसत नाही.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात ज्या गोष्टींची गरज आहे त्याकडे दुर्लक्ष केले जाते. ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम हा विषय सामाजिक हितासाठी जिव्हाळ्याचा असायला पाहिजे परंतु, या विषयाकडे समाजातील तथाकथित स्वयंघोषित समाज नेते मात्र गांभीर्याने बघत नाहीत समाजाची हिच मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणे म्हणजे लहान मुलांचा खेळ नाही.समाजात नेतेगिरी करणारे सामाजिक वैचारिक आणि नैतिक जबाबदारी समजणारे तसेच बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान,समाजाचा परिपूर्ण अभ्यास अवगत असणारे सर्वगुणसंपन्न आणि विविध विषयांवर ज्ञानसंपन्न परिपक्व असणे गरजेचे असते.नेतृत्व करणारे,स्वतःला नेतृत्व समजणारे,उत्साही आणि नेतेगिरचं बाशिंग गुडघ्याला बांधून बसलेले,नेतेगिरी करण्यासाठी उतावीळ असलेले काही युवक नेते सामाजिक वैचारिक आणि नैतिक जबाबदारी समजणारे,समाजात विकासात्मक आणि विविध विषयांवर समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यासाठी बुद्धिवान,गुणवत्ताधारक असणे गरजेचे असते.कारण समाजात नेतेगिरी करणे म्हणजे समाजाची सामाजिक सर्वांगीण विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक जबाबदारी खांद्यावर येऊन पडलेली असते आणि समाजात नेतेगिरी करणे एखाद्या येड्यागबाड्याचे,ऐऱ्यागैऱ्याचे काम नसते.

विश्र्वकर्मीय सुतार समाज हा स्वतःला सुशिक्षित उच्चवर्णीय समजतो.इथंच समाजात जागृतीचा मोठा अभाव जाणवतो, वास्तविक विश्र्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी म्हणजेच बहुजन समाज आहे.याचे भान सुद्धा नसावे याचे वाईट वाटते,सुतार समाजात आजही विश्र्वब्राह्मण म्हणजे उच्चवर्णीय समजतात आपण ओबीसी आहोत आणि ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहोत या बद्दल समाजात जबाबदारीने सांगण्यास कोणीही पुढाकार घेतांना दिसतं नाही त्यामुळे समाजात चुकीची माहिती पसरवली जाते आणि विश्र्वकर्मीय सुतार समाज ओबीसी समाजाचा एक मोठा ओबीसी घटक आहे.हे आजच्या तरुण पिढी पासून लपविले तर भविष्यात येणारी तरुण पिढी स्वतःला काय म्हणून घेणार याचा गांभीर्याने जबाबदारीने विचार कोणी करतांना दिसत नाही.

संपूर्ण विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज आपल्याच कब्जात आहे अशा थाटात वावरणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यभरातील खेडोपाडी,शहरात,कानाकोपऱ्यात,वाडीवस्तीमध्ये,गावागावात ओबीसी संदर्भात समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करावा आणि राज्यस्तरीय विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्याचा झंझावात निर्माण करावा.तसेच समाजातील असंख्य मान्यवर राज्यभरात विविध जिल्ह्यातील सामाजिक मंचावर समाजाचे जबाबदार कर्तबगार प्रतिनिधी म्हणून मानसन्मान प्राप्त करणारे,तसेच जबाबदार हजारो पदाधिकारी मित्रांनी,पत्रकार,साहित्यिक ,विचारवंतानी सुद्धा ओबीसी संदर्भात समाज प्रबोधन करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे अशी माफक अपेक्षा व्यक्त केली तर चुकीचे ठरणार नाही.

ओबीसी सुतार समाजात अनेक जबाबदार आणि स्वतःला मान्यताप्राप्त प्रतिष्ठित समजणारे व्यक्ती आहेत अर्थातच राज्यस्तरीय विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात जेवढ्या सामाजिक संघटनांची निर्मिती करण्यात आलेली असेल त्या त्या संघटनांच्या माध्यमातून स्वतःला प्रतिष्ठित व्यक्ती म्हणूनच समाजात मिरवत असतील आणि राज्यस्तरीय विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील विविध जिल्ह्यातील विविध कार्यक्रमात सामाजिक मंचावर मोठ्या थाटात मानसन्मान प्राप्त करीत असतील त्यांची जबाबदारी आहे ती त्यांनी समाज जनजागृती वैचारिक प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.परंतु,असे होतांना दिसत नाही याला समाजाचे भाग्य म्हणावे कि,दुर्भाग्य म्हणावे असा प्रश्र्न आजच्या तरुण पिढीला,सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान समाज बांधवांना पडला पाहिजे.विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे एकप्रकारे समाजाचे पालकच असतात असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही पण जिथे बापच जाग्यावर नाही तर पोरं काय करतील असं म्हणायची वेळ येईल.?

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे ओबीसी बद्दल समाजात समाज प्रबोधनात्मक दृष्टीने महत्व,गांभीर्य समजत नसलेले आणि दिशाहीन असलेले,ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी बद्दल अपयशी मानसिकतेचे आणि विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करण्यासाठी लायक नसलेले,वैचारिक परिपक्वता नसलेले,सामाजिक विकासात्मक आणि विविध विषया संदर्भात समाज प्रबोधनात्मक नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य समजत नसलेले विशेषतः सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिप्रामाण्यवादी,बुद्धिवान असलेल्या विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करण्यासाठी लागणारी सर्वगुणसंपन्नता,गुणवत्तापूर्ण योग्यता,निकष,पात्रता आणि क्षमता सुध्दा नसतांना फक्त नेतेगिरीसाठीच निर्लज्जपणे,उतावीळपणे स्वतःच्या नावासाठी आणि मोठेपणासाठीच हापापलेले स्वयंघोषित समाज नेते असतील तर मात्र आवर्जून सांगावेसे वाटते कि,विश्र्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल!



**जय संत भोजलिंग जय ओबीसी जय संविधान**
**प्रमोद सुर्यवंशी ८६०५५६९५२१**
**चिखली मातृतीर्थ बुलडाणा.३**

# सायबर कॉमिक बुकचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्या हस्ते अनावरण

सातारा (जिमाका): सध्या मोबाईल, संगणक, ऑनलाईन



बँकिंग, सोशल नेटवर्किंग साईट, इत्यादी गोष्टींचा वापर युवा पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेला असून मोबाईल, टॅब, संगणक व इंटरनेट हे व्यक्तीचे दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. मोबाईलमधील वेगवेगळ्या ॲप्लीकेशच्या माध्यमातुन विविध ॲपसद्वारे सायबर गुन्हयांमध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. सायबर गुन्हयांमध्ये फेसबुक, इंन्स्टाग्राम, टेलीग्राम, शेअरचॅट, ट्विटर अशा सोशल नेटवर्किंग साईटचा वापर करून व्यक्तींची बदनामी करणे, आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच सोशल मिडीयावरुन फिशींग, आयडेंटीटी श्रेष्ट, रैमसनवेअर अटॅक, हॅकिंग, सायबर स्कॅमस, सायबर बुलींग, स्टाकिंग, सॉफ्टवेअर पायरसी, सोशस मिडीया फ्रॉडस, ऑनलाईन ड्र्ग्ज ट्राफिकिंग, इलेक्ट्रॉनिक मनी लॉन्डरींग, सायबर इक्स्टॉर्शन, ऑनलाईन रिक्रूटमेंट फ्रॉडस, इत्यादी प्रकारचे सायबर गुन्हे सध्या समाजामध्ये घडत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात पोलिस विभागाकडील विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक आँचल दलाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे, यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. याबाबत जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या सायबर कॉमिक बुकचे अनावरण पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्याहस्ते झाले.

सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता करण्याकरीता ०१ जुलै २०२४ पासून सातारा जिल्हा पोलीस दल व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमानाने सातारा जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सायबर जागरुकता वाढविण्याकरीता सायबर जागरुकता अभियान राबविण्यात येणार आहे.

यामध्ये सातारा जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकता निर्माण करण्याकरीता सातारा जिल्हा पोलीस दलाकडून सायबर जागरुकतेसंबंधी सर्व सामग्री पुरविण्यात येणार आहे. यामध्ये इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सदरसामग्रीचा वापर करुन १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ या कालावधीमध्ये जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकतेबाबत प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल व या परिक्षेमधून ज्या विद्यार्थ्यांना (१ मुलगा १ मुलगी) चांगले गुण मिळतील त्यांना त्याच शाळेचे सायबर ॲम्बेसीडर म्हणून निवडण्यात येईल व त्यांचे मनोबल वाढविणेकरीता ऑगस्ट २०२४ चे पहिल्या आठवडयामध्ये त्यांचा सत्कार घेण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा उपयोग सायबर गुन्हयांना प्रतिबंध करण्याकरीता होणार आहे.

## पुनर्वसनाची कामे गतीने आणि दर्जेदार करा - पालकमंत्री शंभुराज देसाई

सातारा (जिमाका): पाटण तालुक्यातील आंबेघर खालचे,



आंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी, (जिंती), काहीर, या अतिवृष्टीमुळे भूस्खलन बाधित गावांच्या पुनर्वसनास शासनाने मान्यता दिली आहे. या गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाअंतर्गत बाधित कुटुबांना द्यावयाची प्रस्तावित असलेली ५५८ घरकुले व इतर सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून ही कामे गतीने आणि दर्जेदारपूर्ण करा, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री आणि पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी दिले.

पाटण तालुक्यातील दरडग्रस्त व भूस्खलनग्रस्त गावांच्या पुनर्वसन, बांधकाम व पायाभूत सुविधांच्या कामांबाबत आढावा घेण्यासाठी पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक आँचल दलाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, प्रातांधिकारी सुनील गाडे, यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

भूस्खलनबाधित गावांमधील कुंटुबांचे गोकूळ तर्फ पाटण, काहीर, शिद्रुकवाडी (धावडे), चाफेर, देशमुखवाडी, मोडकवाडी याठिकाणी घरकुले बांधून देवून पुनर्वसन करण्यात येणार आहे. १९९ कोटी ५७ लाख खर्चून पुनर्वसनाचे काम करण्यात येणार आहे. घरे बांधून देणे व तेथील ले ऑउट विकासकामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावी असा निर्णय झालेला आहे. पुनर्वसीत ठिकाणांमध्ये प्राथमिक शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन, समाजमंदिर, सार्वजनिक स्वच्छता गृहे, खेळाचे मैदान, कंम्पाऊंड भिंत, प्रवेश कमान, पथदिवे, पाणीपुरवठा सुविधा, वैयक्तिक एकल विद्युत जोडणी, रेनवॉटर हारवेस्टिंग, सोलार सिस्टीम, इमारतींकरीता आतील व बाहेरील विद्युतीकरण, पुनर्वसन गावांमध्ये ९ मीटर व १२ मीटर रुंदीचे डांबरी रस्ते, रस्त्यालगत दुतर्फा सिमेंट काँक्रीटच्या गटारी, जनावरांकरीता पिण्याच्या पाण्याची सुविध अशा सर्व सुविधा पुरविण्यात येणार आहेत. या सर्व सुविधा व घरकुलांची कामे अत्यंत दर्जेदार करावीत आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी यंत्रणांना दिले आहेत.

बाधित कुंटुबांना देण्यात येणारी घरकुले ५९० चौ. फूट बांधीव क्षेत्रफळाची सिमेंट काँक्रेटची दर्जेदार व आकर्षक असणार असून यामध्ये तळमजल्याला हॉल किचन आणि स्वच्छता गृह, पहिल्या मजल्यावर बेडरूम आणि स्वच्छता गृह अशी ती होणार आहेत. प्रत्येक घरकूल १५ लाख ४० हजार रुपये खर्चाचे होणार आहे. सदरची घरकुले अतिशय आकर्षक व दर्जेदार आणि भक्कम होणार असून त्याची संबंधित कुंटुबांना संकल्पना स्पष्ट व्हावी,

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894